**सोहळा**

त्या सरींचा अन लहरींचा, भाव अंतरी उरे..
चिंब तुझे - धुंद माझे, वेगळेपण ही नुरे !

ठाव घेती या मनाचा, त्या क्षणांचा सोहळा,
मीच होते एक राधा, तूच माझा सावळा !

लोटली युगे परंतु, अजुनी साद ओली मनी,
आठवांची तोरणेही, झुलती आसमंतातुनी !

प्रेमगीत आपुले जे, गाती पाखरांचे थवे,
तेच वेडे क्षण फिरुनी, वाटती हवे - हवे !

**प्रीती देशपांडे**
(प्रीती देशपांडे यांच्या ‘मनतरंग’ या काव्यसंग्रहातून)